

॥ श्री ॥

श्रीमंत अखंडीत ऐश्वर्यलक्ष्मी विराजित सकळ गुणालंकृत राजश्रींचे सेवेसी,
श्रीमंत कफ्रचुडेमण्डित सकळ सौभाग्यसंपन्न जगदंबा आईभवानी सेवेसी,
सुनिल गजानन आचोळकर आणि सौभाग्यसंपन्न शुभांगी सुनिल आचोळकर,
आसोली, सुभे वेंगुर्ले यांचे प्रेमादरेकरोन विज्ञापना,

विशेषतरी,

श्री शंभू महादेव, कुलदेवता, जलदेवता, स्थलदेवता आणि आपणा सकलांचे कृपासिध्दि करोनी आम्हि आमुची सकळ गुणालंकृत सुकन्या चिरंजीव सौभाग्यकांक्षिणी मान्यश्री हिचा श्री शिवशके ३४४, श्री शके १९४० मिती जेष्ठ शुक्ल एकादशी शनीवारे दिन उत्तम म्हणोनी घटी १२ पळी ५६ समयी काकाजीनी वाडी, आकुर्ली, सुभे पनवेल येथे देव ब्राम्हण अग्नी समक्ष श्रीमंत राजश्री कै. सुरेश भिकाजी सावंत आणि श्रीमती सुप्रिया सुरेश सावंत यांचे सुपुत्र चिरंजीव सिध्देश ह्यांचेशी विवाह करणेचे योजिले आहे. हे शुभकार्य सिधीस न्यावयासी आपले आसीर्वाद लाखमोलाचे आहेती तरी आपण या सोहळ्यासी सहकुटुंब, सहपरिवारे जातीने, चौमुलुखाचे वऱ्हाडी, सगे सोयरे, गणगोत अवघे एक मेळ करोन आसीर्वादा येणे करावे. आम्ही हे गाऱ्हाणे अवधियांचे चरणी घातले, ना न म्हणावे. आपणा तो माता-पिता, त्र्यैलोक्याचे देवही आपणची आपल्या आगमने करोन सोनियास गंध येईल; अमृतास सूर गवसेल तयाचे कौतुक काय वर्णावे? आपण आलियाने विवाह सोहळ्यासी बहुतच शोभा येणार असोन आम्हांस उदंड उदंड आनंद होणार आहे हे जाणोन या मुहूर्ती हळदी, कुंकुम, अक्षता हाती घेण्या अगत्यची येणे करावे सबब सांगावी ते काय कारण? आपली चरणधुला या श्रृंगारील्या मंडपी झडावी तेणे शुभकार्य पूर्णत्त्वास जाईल. तरी आमच्या आवतनाच्या सुपारीचा आदर करावा, ऐसी आग्रहाची अर्जवणी आहे.

बहुत काय लिहणे, अगत्य असो द्यावे.

लेखनालंकार, लेखनसिमा।




विवाह समारंभ
दिन शनीवार २३ जुन २०१८
मुहूर्त दोन प्रहरी ११.१२ वाजता
कार्यस्थळ काकाजीनी वाडी, आकुर्ली,
नविन पनवेल-नेरे रोड, जिल्हा, रायगड.
संपर्क १००४१८७७७१

श्रीमंत श्रीमती सुमन ग आचोळकर
समस्त श्री व सौ आचोळकर परिवार
सुभे, पनवेल.